प्रेस नोट

युनिटचे नाव	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलडाणा
आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय	आलोसे श्री.राजेंद्र रघुनाथ वास्कर,वय ५० वर्ष पद—ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) ग्रामपंचायत दाभा ता.मोताळा,वर्ग—३ रा.जिजाऊ कॉलनी,हाजी मंलग दर्गाच्या पाठीमागे,ता.जि.बुलढाणा.
लाच मागणी	२८,०००/— रुपये
लाच स्विकारली	तडजोडीअंती २०,०००/— रुपये
घटनास्थळ	बुलढाणा तहसिल कार्यालयाचे आवारामध्ये
घटना तारीख	०७.११.२०२५

थोडक्यात हकीकत :—यातील तक्रारदार यांची व त्यांचे मयत बहीण,भाऊ यांची ग्राम नाईकनगर ग्रामपंचायत दाभा येथे असलेल्या दोन्ही जागा तक्रारदार यांचे दोन्ही मुलाच्या नावे करुन गाव नमुना ८—अ वर नोंद करुन ८—अ उतारा देण्यासाठी दोन्ही कामाचे मिळुन २८,०००/— रूपये लोकसेवक श्री.राजेंद्र वास्कर, ग्रामसेवक हे लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार आज दिनांक ०७.११.२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत करण्यात आली होती. त्यामध्ये लोकसेवक श्री.राजेंद्र वास्कर, ग्रामसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे नमुना ८—अ मध्ये नाव नोदविण्याकरिता व ८—अ उतारा देण्यासाठी तडजोडअंती २०,०००/—रुपये लाच मागणी करुन लाचेची रक्कम आजच घेवुन येण्यास सांगीतलेवरून आज रोजी तहसिल कार्यालय, बुलढाणा येथील आवारामध्ये सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचेकडून २०,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना लोकसेवक श्री.राजेंद्र वास्कर यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यावरुन आलोसे श्री.राजेंद्र वास्कर यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदर कार्यवाही :—

१.मा.श्री.बापू बांगर, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती,परिक्षेत्र अमरावती.
मों.नं.९०११३२३४२६

२.मा.श्री. सचिंद्र शिंदे,अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती.
मों.नं.९७६४२१०४८५

३.मा.श्री.भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,बुलढाणा.
मों.नं.९५५२५२०१८८

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री.रमेश पवार,पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक, श्री.विलास गुसिंगे व सफौ शाम भांगे, पोहेकॉ प्रविण बैरागी, राजेंद्र क्षिरसागर, अमोल झिने, पोना जगदीश पवार, पोकॉ रंजीत व्यवहारे, शैलेश सोनवणे, लक्ष्मीकांत इंगळे, चानापोका नितीन शेटे,अर्शद शेख मपोकॉ स्वाती वाणी सर्व ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.येथे दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व व्हाटस अप क्रमांक ९४०५०९१०६४ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधून तक्रार करण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

(भागोजी चोरमले)
पोलीस उपअधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.

पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्यूरो * बुलडाणा *
सत्यमेव जयते